नि.दि.दावा क्र. ६२/२०२५

अमित – विरुध्द – जनरल मॅनेजर

MHNG100008182025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १५.०४.२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १५.०४.२०२५ |
| निकाल तारीख | : | १७.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०० व. ११म. ०२दि. |

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उमरेड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी रा.भा. डोळे यांचे समक्ष)**

नियमीत दिवाणी दावा क्र.६२/२०२५ निशाणी क्र.२५

वादी : १. **अमित उर्फ अमितकुमार भास्करराव चोपडे,**
वय – ३५ वर्ष, व्यवसाय – खाजगी,
राह. प्राथमिक आरोग्य केंद्र मकरधोकडा,
तह.उमरेड,जि.नागपुर.
**ह.मु.** प्लॉट न.१२३ शनी मंदिर जवळ, रुख्मीनी नगर, नागपुर
तह., जि. नागपुर

..विरुध्द..

प्रतिवादी : १. **वेस्टर्न कोल फिल्ड लिमीटेड, उमरेड, तर्फे जनरल मॅनेजर**
डब्ल्युसीएल, तह.उमरेड, जि.नागपुर

---

**विधिज्ञ :** श्री.पी.वाय.सुखदेवे वादीतर्फे.
श्री ए.बी.पोंगडे प्रतिवादी तर्फे

---

**दावा : जाहीर घोषीत होऊन मिळण्याबाबत.**

**न्या य नि र्ण य**

**(पारित दिनांक १७ मार्च, २०२६)**

प्रस्तुतचा दावा हा जाहीर घोषीत होऊन मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

**वादीचे दाव्यातील वाद कथन पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडता येईल.**

**दावा :**

२. वादी हा मौजा–मकरधोडा, तह.उमरेड, जि. नागपुर येथील कायम रहीवासी आहे. त्याने मौजा बोपेश्वर येथे सन २०२१ मध्ये शेतजमीन खरेदी केली आहे. ती जमीन ताराचंद भास्कर श्रीखंडे यांच्यासोबत संयुक्तरित्या खरेदी केली आहे. गट न.६७/२ आराजी.८२ हे. आर. ही ती मिळकत असुन, त्यावर वादी व ताराचंद श्रीखंडे यांचे संयुक्तरित्या नावे नोंद झाली आहे. सदरची शेतजमीन ही डब्लु.सी.एल. यांनी अधिग्रहीत केली आहे. परंतु, महसुल दप्तरी वादीचे नाव अमितकुमार भास्करराव चोपडे असे नमुद करण्यात आले.

३. वादीचा जन्म सन १९८९ मध्ये झाला. शालेय दस्तऐवज व रेशन कार्डवर वादीचे नाव अमित भास्करराव चोपडे असे नमुद आहे. ७/१२ उता–यावर अमितकुमार भास्करराव चोपडे असे झाले आहे.

४. त्यामुळे वादीचे नावाची घोषणा होण्यासाठी वादीला विद्यमान कोर्टात सदर दावा दाखल करणे भाग पडले आहे. वादीने सदर दाव्याशिवाय इतर कुठेही नावाची घोषणा

होण्याबदल दावा दाखल केलेला नाही तसेच दावा प्रलंबित सुध्दा नाही. सबब त्यांनी दावा मंजुर करावा अशी विनंती केली.

**<u>प्रतिवादी यांची कैफियत</u> :**

५. प्रतिवादी यांनी नि.क्र. ९ अन्वये कैफियत दाखल केली. त्यांनी दाव्यातील सर्व मजकुर विवक्षीतपणे नाकारला. तसेच त्यांनी प्रतिवादीला कायदेशीर नोटीस निर्गमीत केली नाही. त्यामुळे दावा खारीज करण्यात यावा. वादीला त्यांच्या नावात विसंगती आहे याबाबत माहीती हवी होती. परंतु, त्यांनी आजपर्यंत त्याबाबत कोणतेही प्रयत्न केले नाही. त्यामुळे दावा कायदेशीर नाही. सबब, दावा खारीज करण्यात यावा, अशी विंनती केली.

६. न्यायालयाने नि.क्र. १० अन्वये मुद्दे निश्चित केले. मी ते मुद्दे चर्चेकरीता खालीलप्रमाणे नमुद करित असून, त्यावर कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे जाहीर घोषीत होऊन मिळण्यास पात्र आहे काय ? | **होय** |
| २. | दाव्यास कायद्याचा रोध आहे काय ? | **नाही** |
| ३. | काय आदेश व हुकूमनामा ? | अंतीम आदेशा प्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

७. वादी यांनी त्यांच्या मुद्दे पृष्ठ्यर्थ नि.क्र. ११ अन्वये स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर वादी यांनी भास्कर उत्तमराव चोपडे यांचे शपथपत्र नि.क्र. १२ अन्वये दाखल केले आहे. वादी यांनी नि.क्र. २३ अन्वये पुरसीस दाखल करुन दि. २३.०१.२०२६ रोजी त्यांचा पुरावा बंद केला. त्या व्यतिरिक्त त्यांनी त्यांची भिस्त खालील दस्तांवर ठेवली आहे. प्रतिवादी यांनी दिलेले पत्र नि.क्र.१४ अन्वये दाखल आहे. ७/१२ नि.क्र.१५ अन्वये दाखल आहे. गाव नमुना ८ अ नि.क्र.१६ अन्वये दाखल आहे. फेरफार नोंद नि.क्र.१७ अन्वये दाखल आहे. वादेची आधार कार्ड व पॅन कार्ड नि.क्र.१८ व १९ अन्वये दाखल आहे. राजपत्र नि.क्र.२० अन्वये दाखल आहे. १० वी पास झाल्याबाबतचे प्रमाणपत्र नि.क्र.२१ अन्वये दाखल आहे. रेशन कार्ड नि.क्र.२२ अन्वये दाखल आहे, इत्यादी दस्तांवर त्यांनी भिस्त ठेवली.

८. प्रतिवादी यांनी नि.क्र.२४ अन्वये पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. त्यांनी पुरावा दिला नाही.

### <u>मुद्दा क्र. १ व २ साठी –</u>

९. वादी यांनी दाव्याशी सुसंगत असे शपथपत्र दाखल केले. तसेच त्या पृष्ठर्थ त्यांनी उपरोक्त नमुद दस्तावेज दाखल केले. या ठिकाणी मी वादी यांची उलटतपासणी मधील काही कबुली नमुद करीत आहे. वादी यांनी कबुल केले की, दावा दाखल करण्यापुर्वी त्यांनी प्रतिवादीस नोटीस पाठविला नव्हता, या व्यतिरीक्त त्यांनी प्रतिवादी यांचे कथन साफपणे

नाकारले. वादी यांचे साक्षीदार यांनी देखील वादी यांना सुसंगत अशी साक्ष नोंदविली.

**१०.** वादी यांनी शपथपत्रात असे नमुद केले की, महसुल अभिलेखावर त्यांचे नाव अमितकुमार भास्करराव चोपडे असे आहे व शालेय दस्तावेजावर अमित भास्करराव चोपडे असे नमुद आहे. त्यासाठी त्यांनी शासननिर्णय मध्ये त्यांचे नाव प्रकाशीत केले आहे. नि.क्र. २० अन्वये ते दस्त दाखल आहे. नि.क्र.२१ हे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र आहे. त्यामध्ये विदयार्थाचे नाव अमित असे नमुद आहे. नि.क्र. १८ व १९ चे अवलोकन केले असता, ते आधारकार्ड आहे व पॅनकार्ड आहे. त्यामध्ये अमितकुमार भास्करराव चोपडे असे नाव नमुद आहे.

**११.** नि.क्र.२० चे अवलोकन केले असता, ते महाराष्ट्र शासनाचे राजपत्र आहे. त्यामध्ये हे जाहीरपणे राजपत्रात घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे अमित भास्करराव चोपडे व अमितकुमार भास्करराव चोपडे या दोन्ही एकच व्यक्ती आहे. असे अभिलेखावरुन दाखल दस्तावरुन दिसते.

**१२.** प्रतिवादी यांनी आक्षेप घेतला की, त्यांनी कायदेशीर नोटीस दिला नाही. त्याबाबत वादीने ते तथ्य कबुल केले आहे. तसेच त्यांच्या नावामधील फरक त्यांना सन २०२१ ला कळाला, असे त्यांनी कथन केले. दि. २०.०३.२०२५ रोजी प्रतिवादी यांनी वादी यांना पत्र पाठविले, आणि त्या अनुषंगाने दावा दाखल केला, असे वादी यांचे कथन आहे. नि.क्र. १४ चे अवलोकन केले असता, यामध्ये नोकरीच्या प्रस्तावातील त्रुटीबाबत नमुद आहे.

त्यामध्ये न्यायलयाकडून हुकमनामा या कागदपत्राची पुर्तता करण्याचे नमुद आहे. प्रतिवादी यांनीच पुर्तता करावयास सुचीत केले. तसेच दावा हा पत्र प्रतिवादी यांना प्राप्त झाल्यानंतर दाखल केला आहे. त्यामुळे दावा तुर्त तरी मदतीत आहे. त्यास फर्मानची आवश्यकता नाही, कारण प्रतिवादी यांनीच सदरची त्रुटी बाबत कारवाई करण्यासाठी करावी असे पत्र नि.क्र. १४ अन्वये दिले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चा होकारार्थी व मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ साठी -</u>**

**१३.** वादी यांनी पुरावा दाखल केला आहे. त्यांनी त्यांच्यावर असलेल्या मुद्दयांचा भार हा प्राबल्याच्या शक्यतेवर शाबीत केल्याचा दिसून येतो. प्रतिवादी यानी पुरावा दिला नाही. त्यामुळे उभय पक्षकारांनी दाव्याचा खर्च स्वतः सहन करावा असेच सांगणे न्यायोचित आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र. ०३ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>: आदेश :</u>**

- वादीचा दावा मंजुर करण्यात येतो.
- अमित भास्करराव चोपडे व अमितकुमार भास्करराव चोपडे हे दोन्ही नाव एकाच व्यक्तीचे आहे, असे जाहीरपणे घोषीत करण्यात येते.
- उभय पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.
- येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

- न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आले.

RAJU BHASKAR DOLE Judgment Digitally signed by RAJU BHASKAR DOLE Date: 2026.03.17 17:27:54 +0530

उमरेड . (रा.भा. डोळे)

दिनांक : १७.०३.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड

**नि.दि.दावा क्र. ६२/२०२५**

**अमित – विरुध्द – जनरल मॅनेजर**

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – कु.एस.बी.घर्डीनकर

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड .

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – १७.०३.२०२६

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३